## महाराष्ट्र शासन

क्र.ग्रापापु २००६/प्र.क्र.२४०/पापु ०७,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८ सप्टेंबर, २००६.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हापरिषद (सर्व).

विषय :- जिल्हापरिषदेमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभागासाठी वाहने भाडयाने लावण्याबाबत.

महोदय,

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी जिल्हापरिषदेमध्ये पाणी पुरवठा विभाग व उपविभाग कार्यान्वित आहेत. विभागाकरीता प्रत्येकी १ कार व उपविभागाकरीता प्रत्येकी १ जीप अनुज्ञेय आहे. जिल्हापरिषदेकडे सध्या कार्यान्वित असलेले विभाग व उपविभागांपैकी काही विभाग व उपविभाग लघु पाटबंधारे विभागाकडून व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून हस्तांतरीत करण्यात आलेले आहेत. या हस्तांतरीत केलेल्या सर्वच विभाग व उपविभागा सोबत वाहने हस्तांतरीत झालेली नाहीत. अथवा जी वाहने हस्तांतरीत झाली ती फार जूनी असल्याने कालांतराने ती निर्लेखित करावी लागली आहेत. त्यामुळे जिल्हापरिषदांमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभागाच्या कामकाजावर मर्यादा आल्याचे विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

२. या संदर्भात आपले लक्ष शासन निर्णय वित्त विभाग क्र.वाहन १०००/प्रक.६५/२००१/विनियम, दि.१०.०९.२००१ कडे वेधण्यात येत असून उक्त शासन निर्णयानुसार वाहने भाडयाने लावण्याचे अधिकार आपणास असल्याने जिल्हापरिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग/उपविभागातील जी अनुज्ञेय वाहने निर्लेखित केली आहेत अथवा हस्तांतरीत विभाग/उपविभाग सोबत हस्तांतरीत झालेली नाहीत तेथे उक्त शासन निर्णयात नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन वाहने भाडयाने लावण्याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावर त्वरित घेण्यात यावा.

३.    वाहने भाडयाने लावण्यासाठी येणारा खर्च २२१५ पाणी पुरवठा व स्वच्छता  या मुख्य लेखाशिर्षाअंतर्गत २२१५-१८८१ या सांकेतांकाखाली जिल्हा परिषदांना देण्यात येणा-या अनुदानातून भागविण्यात यावा, ही विनंती.

आपला

( सुधाकर ज्ञा. बोबडे )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) विभागीय आयुक्त (सर्व)

२) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हापरिषद (सर्व)